# जाहिरात.

मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद शहर येथील खालील CCTV कॅमेरे यांची देखभाल दुरुस्ती वार्षीक करार करणेसाठी सिलबंद दरपत्रके (निविदा) मागविण्यात येत आहेत.

तपशिल

| अ.क्र. | वस्तुचा तपशिल | नग |
|---|---|---|
| ०१ | सिसिटीव्ही कॅमेरे | ५९ |
| ०२ | एल.ई.डी. मॉनिटर | ११ |
| ०३ | टी.व्ही.सेट | ०३ |
| ०४ | डी.व्ही.आर. | ०९ |
| ०५ | यु.पी.एस. | ०१ |

**नियम व अटी :-**

१) सदरचे दरपत्रकामध्ये दर GST/ सर्व करासहीत दर नमुद करुन सिलबंद दरपत्रक दि. ०५~~०४~~/०३/२०२४ ते दि. १२/०३/२०२४ रोजी पावेतो सकाळी ०९.४५ ते १८.१५ या कार्यालयीन कामाचे वेळेमध्ये आवक जावक शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील बंद निवीदा पेटीमध्ये टाकावीत.

२) पुरवठादार यांनी दरपत्रकासोबत GST No, Pan Card छायांकीत प्रत सादर करावी. तसेच दरपत्रक/कोटेशनमध्ये GST No. नमुद करणे आवश्यक आहे.

३) दरपत्रक मंजुर करणेचे अथवा रद्द करणेचे सर्व अधिकार मा.पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना राहतील. त्याबाबतची कारणे सर्व संबंधितास कळविणे हे या कार्यालयास बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

४) संस्था/पुरवठाधार यांचे दुकान नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत सादर करावी.

५) न्युनतम दराचे दरपत्रक मंजुर झाल्यानंतर यशस्वी निविदाधारकास कार्यादेश देण्यात येतील. व कार्यादेशाप्रमाणे अटी व शर्तीनुसार व मान्य केलेले दरानुसारच CCTV कॅमेरे यांची देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा वेगळा वाहतुक खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

६) शासन निर्णय क्रमांक उर्जा व कामकार विभाग शासन निर्णय क्रमांक मांखस/प्रक्र-८२/भाग-१११/उद्योग-४ दिनांक.०१/१२/२०१६ मधील नियम ६.४ परि.४-अ प्रमाणे कामामध्ये विलंब झाल्यास दंडनीय शुल्काची रक्कम पुरवठाधारकाकडून वसुल करण्यांत येईल.

७) देयकातुन प्रचलीत शासन नियमानुसार २% आयकर व २% GST कपात करुन उर्वरित रक्कम देय राहील.तसेच मान्य केलेले दर सर्व करासहीत असलेने ईतर कोणत्याही प्रकारचा कर अथवा खर्च अनुज्ञेय राहणार नाही. व मंजुर केलेले दराप्रमाणे देयकाची आकारणे करणे बंधनकारक राहील.

८) देखभाल दुरुस्तीचे काम वेळेवर करणे बंधनकारक राहील. त्याबाबत कांही तक्रार आल्यास किंवा पुरवटादार यांची कामे समाधानकारक नसल्यास किंवा कार्यादेशातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास मा.पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी कोणत्याही टप्यात सदरचा करार रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवलेला आहे.

९) निविदाराकारास निविदेमध्ये नमुद करण्यांत आलेलेल्या अटी व शर्तीनुसार काम करणे बंधनकारक राहील.

१०) अनुदानाअभावी देयकाचे प्रदान करण्यास विलबं झाल्यास पुरवठाधारकास विलंब शुल्काची मागणी करता येणार नाही.

११) सदर देखभाल/दुरुस्ती कराराचा कालावधी दिनांक ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ पर्यंत राहील.

१२) CCTV कॅमेरे देखभाल/ दुरुस्तीचे मासिक देयक संबधीत प्रभारी अधिकारी यांचेकडुन प्रमाणीत करुन दर महिण्याच्या ०५ तारखेच्या आत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

(मा. पोलीस आयुक्त यांचे मान्यतेने)

( शिलवंत नांदेडकर )
पोलीस उपआयुक्त(मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर